**प्रकरण -3**

**अध्याय -२**

**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>संस्थेच्या आधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार व कर्तव्य याबाबतचे तपशील</u>**

| ४(१)()(ग) |
|---|

**<u>अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये :-</u>**

१. अतिरिक्त आयुक्त /म.न.पा.आयुक्त यांच्या निर्देशानुसार तक्रारींचा काळजीपूर्वक तपास करुन अहवाल सादर करणे. मान.महापालिका आयुक्त यांच्या मंजूरी क्र.एमसीपी/६८७५ दि.१४.०५.२०१८ अन्वये ज्या प्रकरणांमध्ये मान.आयुक्त / अतिरिक्त आयुक्त यांच्याकडून निर्देश प्राप्त होतील त्याच प्रकरणांची पडताळणी / छाननी प्रमुख अभियंता (दक्षता) विभागामार्फत करण्यात येईल.

२. प्रचलित धोरणानुसार कामाचा दर्जा, परिणाम यांची तपासणी करणे आणि निविदेतील अटी व शर्तीनुसार कामांमध्ये त्रुटी, सूट / शिल्लक आढळल्यास त्यासंबंधीची निरिक्षणे संबंधित विभागास कळविणेबाबत आदेश देणे.

३. महानगरपालिकेच्या कामांवरुन प्राप्त झालेले मालाचे नमूने जसे ॲस्फाल्ट मिश्रण, मास्टीक ॲस्फाल्ट, डांबर, भूपरिक्षा, खडी, ॲस्फाल्ट कॉंक्रीटच्या घनतेची परिक्षा, जमीनीच्या घनतेची परीक्षा, जमीनीची भूधारण क्षमता, जमिनीची सुरक्षित धारण क्षमता, कॉंक्रीट क्युब्स, लोखंड, विटा, पेव्हर ब्लॉक्स वगैरे आवश्यक ते शुल्क आकारुन निविदेतील अटींनुसार प्रयोगशाळेत तपासले जातात तसेच इतर प्राधिकरणामधील

मालाचे नमुनेही आवश्यकता भासल्यास माल परिक्षण प्रयोगशाळेत तपासण्याबाबतचे निर्णय घेतले जातात.

४. मागविलेल्या मालाचा दर्जा /परीणामांची तपासणी करण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या भांडाराला अचानक भेटी देणे / तपासणी करण्याबाबतचे आदेश देणे.